# यशोगाथा

## डी.बी.देशमुख शेळी पैदास केंद्र

**नाव** :- **श्री दत्तात्रय बाळासाहेब देशमुख.**

**पत्ता** :- मु. पो. कौसडी, ता. जिंतुर, जि. परभणी.

**दुरध्वनी क्र.** :- ९०९६१९१०८७, ९५०३१७४२४३

**व्यवसाय** :- शेळीपालन, शेती.

**मिळालेला सन्मान** :-
१. सन २०१२-१३ आत्मा अंतर्गत तालूका स्तरीय उत्कृष्ठ शेतकरी पुरस्कार (शेळी पालन )
२. परभणी येथील सय्यद तुराबुल हक ऊर्स अंतर्गत पशु प्रदर्शनामध्ये "राजा" नावाच्या उस्मानाबादी नराला प्रथम पारितोषिक मिळाले.
३. मा. मुख्य कार्यकरी अधिकारी, जि. प. परभणी व मा. जिल्हाधिकारी, परभणी यांच्या हस्ते उस्मानाबादी गटास व्दितीय पारितोषिक मिळाले.

**प्रस्तावना :-**

शेळयांचे व्यवस्थापन प्रामुख्याने दोन पध्दतीने केली जाते. त्या पैकी एक पारंपारिक पध्दत व दुसरी बंदिस्त शेळीपालन पध्दत होय. पारंपारिक पध्दतीत शेळया दिवसभर चरायला सोडतात. यावर वेगळा असा खर्च होत नाही. हि कमी खर्चाची पध्दत असली तरी. कळप वाढवण्यामागे ठरावीकता नसते, तसेच रोगांची लागण लवकर होऊ शकते, शेळया आजाराला लवकर बळी पडतात यावर आपले नियंत्रण नसते. बंदीस्त किंवा निमबंदीस्त शेळी पालनामध्ये शेळयांचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे करता येते.

श्री डी. बी. देशमुख यांनी शेती व्यवसायाबरोबरच निमबंदीस्त शेळीपालन व्यवसाय सुरु केला आहे. हा व्यवसाय त्यांनी सन २०१० मध्ये १५ शेळया व एक बोकड असा सुरु केला.यासाठी त्यांनी उस्मानाबादी शेळीच्या जातीची निवड केली आहे. आज त्यांच्या फॉर्म मध्ये ८० शेळया, १०० करड, व ५ बोकड आहेत.

**प्रमुख वैशिष्टे :-**

श्री. डी.बी. देशमुख यांनी त्यांच्या शेळी पालनाला " शेळी पैदास केंद्र" असे नाव दिले आहे. या शेळी पैदास केंद्रात प्रामुख्याने निवड पध्दतीने प्रजनन केले जाते. त्यामध्ये जुळी देणारी मादी, दोन वेतातील अंतर कमी करणे यावर जास्त भर देण्यात येते. यासाठी शेळयांचे दुध हे फक्त पिलांनाच पाजले जाते. विलेल्या शेळ्यांना अतीरिक्त चारा व खाद्य दिले जाते. यामुळे शेळया लवकर माजावर

येतात व दोन वेतातील अंतर कमी करण्यात मदत होते. करडे जन्मल्यापासुन ते विक्रीपर्यंत सर्व बाबींची नोंद ठेवली जाते. या केंद्रात प्रामुख्याने लसीकरण व रोग निवारण यावर लक्ष दिले जाते. पारंपारिक पध्दतीने प्रजनन रोखण्यासाठी आणि सुलभ व्यवस्थापनासाठी शेळ्यांचे तीन गट केले जातात वयात आलेले बोकड, पिले व मादया ही वेगवेगळी ठेवली जातात.

**शेळयांचे व्यवस्थापन :-**

श्री. डी.बी. देशमुख यांनी शेळयांच्या व्यवस्थापनासाठी निमबंदीस्त पध्दतीचा अवलंब केला आहे. निमबंदीस्त शेळी पालन करण्यामागे मुख्य कारण म्हणजे शेळयांची चाऱ्यासाठीची भटकंतीची सवय होय. श्री डी.बी. देशमुख यांनी एक एकर जमिनीवर कुंपन बांधुन यामध्ये शेळया मोकळया सोडल्या जातात. यात बोकडांचा समावेश नसतो.कुंपनाच्या आत रात्री शेळयांना ५०x१००ft. च्या शेडमध्ये ठेवण्यात येते, यात मुख्यतः गाभण शेळया व करडांचा समावेश असतो, तेथे त्यांना चारा व खादय देण्यात येतो. कुंपनाच्या आतच ४ x ५० ft. आकाराचा पाण्याचा हौद बाधन्यात आला आहे. साधारणतः चार एकर जमिनीमध्ये चारा पिकांचे लागवड केली जाते. चाऱ्यामध्ये मख्यतो एक एकर नेपियर गवत, अर्धा एकर मका, अर्धा एकर कडवळ, एक एकर लसुन घास, एक एकर मेथ्या घास यांचा समावेश प्रती दिवस दोन किलो प्रती शेळी चारा देतात तसेच तुरीचा भुसा व कडबा कुटी सुध्दा वापरला जातो. तसेच खुराक म्हणुन गाभन व वेलेल्या शेळंना खुराक म्हणुन हरभरा दाल/गव्हाचा भरडा / करडी/मका यांचे मिश्रण १०० ग्रॅम प्रती वयस्क शेळी तसेच ५० ग्रॅम करडांना दिला जातो. शेळयांचे आरोग्य राखण्यासाठी वेळेवर लसीकरण व औषधोपचार खालील प्रमाणे केले जातात.

| अ.क्र. | रोगाचे नाव | लसीचे नाव / रक्षा | लसीकरणाचा काळ |
|---|---|---|---|
| १ | लाळया सुरकत | एफ.एम.डी.पीलीव्हलेंट व्हॅक्सीन | सप्टेंबर / ऑक्टोंबर |
| २ | आंत्रविषार | इटीव्ही | फेब्रुवारी / मार्च |
| ३ | घटसर्प | एच.एस.व्हॅक्सीन | फेब्रुवारी / मार्च |
| ४ | धनुर्वात | टिटॅनस टॉक्साईड | गाभण शेळयांना (विण्यापूर्वी १ महिना) |
| ५ | रिंडरपेस्ट | पि.पि.आर. | तीन वर्षात एकदा |
| ६ | निमोनिया | ॲन्टीबायोटिक | पावसाळयात फक्त रोगी शेळ्यांना |

**आर्थिक :-**

साधारणतः शेळया दिड वर्षात दोनदा वितात. यात जुळी देणारी मादयांचा समावेश असल्यास करडांची संख्या वाढते. आतापर्यंत साडेतीन वर्षात श्री. डी.बी. देशमुख यांनी जवळपास ३०० पिलांची/ करडांची विक्री केली आहे. विक्री वेळी करडांचे वय तीन ते साडेतीन महिने व वजन १२ ते १५ किलो असते. त्यांना २५००-३००० प्रती पिले असा दर मिळातो. त्यातुन त्यांना आतापर्यंत ८ ते ९ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले, साधारणतः आतापर्यंतचा (शेड १,४०,००० ,मजुरी १,२०,००० , लसीकरण / औषधी १२०००,खाद्य ४५,०००, विद्यूत बिल ३,०००) ३,२०,००० रु. त्यांचा खर्च झाला. खर्च वजा जाता त्यांना ५ ते ६ लाख रु. निव्वळ नफा झाला तसेच सध्या फार्म मध्ये ८० शेळी १०० पिल्ले व ५ बोकड आहेत. शेळयां पासून मिळेला लेंडी खत हा वार्षीक १५ ते १७ ट्रॅक्टर ट्रॉली हा शेतीसाठी वापरला जातो. शेळयांचे दुध हे फक्त पिलांनाच पाजले जाते त्यामुळे पिलांची लवकर वाढ व वजन वाढते. व्यवसाय सेट झाल्यामुळे यावर्षी त्यांना अधिक नफा मिळेल अशी खात्री आहे. एकुणच शेळीपालन हा एक उत्कृष्ट, सहज असा शेती पुरक व्यवसाय असुन त्यातुन शेतकऱ्यांना चांगली आर्थिक प्रगती साधता येते, असे श्री डी.बी. देशमुख यांचे मत आहे. ते शेळीला शेतकऱ्यांचे “एटीएम” असे संबोधतात. जेव्हा शेतकऱ्याला पैशांची गरज पडेल तेव्हा सहज त्याला बाजारात शेळी विकता येते आणि नड भागवली जाते. अशाप्रकारे गरजेनुरुप आणि शक्यतेप्रमाणे प्रत्येक शेतकत्याने शेती बरोबरच शेळीपालन केले तर शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होईल यात शंका नाही.

**इतर कार्य :-**

- शेड चे पाणी विहीर पुर्णभरणसाठी सोडले जाते.
- शासकिय अनुदानावर मुरघास युनिट तयार केले आहे - १० X १० फुट. उंची १५ फुट - मका.
- शेतीत दरवर्षी हरभरा, सोयाबीन व तुर हे पिके घेतली जातात.
- शेतात ३० X ४० फुट आकाराचा ५०० गावराण पक्षांचा पोल्ट्री शेड आहे.

## संकलन


**श्री एस.एन.अंभुरे**
**तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक**
**जिंतुर**

**श्री ऐ.आर. काळे**
**प्रकल्प उपसंचालक आत्मा १**
**परभणी**

# डी.बी.देशमुख शेळी पैदास केंद्र











